महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(AGovt. of Maharashtra Undertaking)
CIN:U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : २६४७५८१४
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग,
प्लॉट जी-९, प्रकाशगड, ४था मजला
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

**जा.क्र. : औसंवि/अ/ २३५३५**

**दिनांक : ०८.०९.२०२२.**

प्रति,
मुख्य अभियंता,
सर्व परिमंडळ कार्यालये, अमरावती / औरंगाबाद / अकोला / भांडूप / बारामती / चंद्रपुर / गोंदिया / जळगांव / कल्याण / कोल्हापूर / लातूर / नागपूर / नांदेड / नाशिक / पुणे / रत्नागिरी.

**विषय :-** रोजंदारी सेवाकाळाची सेवापुस्तिकेत नोंद घेऊन रोजंदारीवरील कर्मचा-यांची सेवा उपदानासाठी ग्राहय धरण्याबाबत.

**संदर्भ :-** कासं/मासं/रो.का./उपदान/३७२० दि.१७.०२.२०१७.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, क्षेत्रिय कार्यालयातील कार्यरत असणाऱ्या नाममात्र हजेरी पटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील परंतु कायम स्वरुपी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापूस्तिकेत तत्संबधीच्या नोंदीच्या आधारे सेवा उपदान अदा करण्यात यावे तसेच जर अशा कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नाममात्र हजेरी पटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा कालावधीच्या नोंदी आढळून न आल्यास कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची तसेच सदरच्या कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांच्या भनिनि खात्यावर मंडळाचा जमा झालेला वाटयाचा विचार करुन कार्यकालाची खात्री करुन घेण्यात यावी व सदरचा कालावधी सेवाउपदानाकरीता ग्राहय धरण्यात यावा. कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा झालेल्या मंडळाच्या वाटयाची भनिनि विभागामध्ये उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची पडताळणी केल्यानंतर सदरचा सेवा कालावधी निश्चित करण्यात यावा व त्याच्या नोंदी सेवापुस्तिकेत घेण्यात याव्यात. अशा प्रकारच्या सुचना संदर्भिय परिपत्रकानुसार यापुर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

रोजंदारीत काम केलेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीच्या नोंदी कुठेच उपलब्ध नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे भनिनि कपातीची तारीख ग्राहय धरुन उपदान अदा करण्यात यावे. अशा प्रकारच्या सुधारीत सुचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी प्रमुख मागणी वेळोवेळी सांघीक कार्यालय स्तरावर करण्यात येते.

याबाबत कळविण्यात येते की, तत्कालीन नाममात्र हजेरी पटावरील रोजंदारी कामगारांच्या प्रथम भ.नि.नि. कपात झालेल्या तारखेची सेवापुस्तकात नोंद घेऊन त्या आधारे अधिसंख्य तारमार्ग मदतनीस पदाचा आदेश देईपर्यंतच्या कालावधीच्या फक्त उपदानाचा लाभ संबंधितास देण्यात यावा. ज्यांचे रोजंदारीचे अपुरे रेकॉर्ड उपलब्ध असेल त्यांना देखील प्रथम भ.नि.नि. कपातीची तारीख ग्राहय धरुन रोजंदारीचे पूर्ण दिवस धरुन उपदान देता येईल. मात्र यापूर्वी जी उपदानाची रक्कम दिली गेली असेल ती वजावट करुन अशी प्रकरणे निकाली काढावी. जर काही प्रलंबित अर्ज असतील तर क्षेत्रिय कार्यालयातील मानव संसाधन विभागातील संबंधितांनी म.रा.वि.मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ कार्यालय, धारावी येथे भेट देऊन सदर कर्मचाऱ्यांची कंपनीत (म.रा.वि.मंडळ) भविष्य निर्वाह निधी प्रथम कपात केल्याच्या तारखेची खात्री करुन तशी नोंद सेवापुस्तिकेत घेऊन त्या आधारे कर्मचाऱ्यांना फक्त उपदानाचा लाभ देण्यात यावा.

(अरविंद भादीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत सविनय सादर :-**
१. संचालक (संचलन) / (मासं), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
२. सहव्यवस्थापकीय संचालक, प्रादेशिक कार्यालय, महावितरण, कल्याण / औरंगाबाद.